Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014

Available online at www.isrj.org

# मध्ययुगीन मराठी सूफी संत कवी



अशोक गौरीशंकर माळगे

*सारांश —* *महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराट्राच्या भूमिमध्ये अनेक संत निर्माण झाले. तसेच या संतानी विविध संप्रदायाची निर्मिती केली. याच कारणाने महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. या संतानी समाजजागृतीचे व समाज प्रबोधनाचे खूप मोठे कार्य केले. यात चक्रधर स्वामी, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास, इत्यादी प्रमुख संत आहेत. याच बरोबर इतर इस्लाम, ख्रिस्ती, वीरशैव, बोध्द, जैन, शी संताचाही समावेश आहे. याच काळात काही मुसलमान मराठी संतकवींनी सुध्दा या कार्यात सहभागी झाले. यात प्रामुख्याने शहा मुंतोजी ब्राह्मणी, हुसेन अंबरखान, चाँदसाहेब कादरी, आलमखान, शेख सुलतान, शेख महंमद, शहामुंनी इत्यांदीनी मराठी सारस्वतास हातभार लावला.*

## *प्रस्तावना :-*

मराठी काव्य वाङ्मयात त्यांनी आपला ठसा उमटविला. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या मते "भारतीय संतानी भारतीय एकात्मतेचा पाया दृढ केला आहे. या संताच्या दृष्टीतील एकात्म-एकरस भारतीय संस्कृतीला धर्माचे, जातीचे, प्रदेशभिन्नतेचे, लिंगाचे, वयाचे, विद्वतेचे अथवा अन्य कसलेही बंधन नाही. या उदार आणि समन्वयशील परंपरेच्या शिल्पकारात हिंदू बरोबर मुसलमानही आहेत."

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

मराठी संस्कृतीच्या, सामाजिक ऐक्याच्या जडणघडणीत या विविध संप्रदायातील संताचे कार्य मोलाचे आहे. मध्ययुगीन कालखंडातील सूफी संप्रदायातील कवींनी ही मोलाची साहित्य निर्मिती केली आहे. यामध्ये पुढील सूफी संताचा कार्य उल्लेखनीय आहे.

**शहा मुंतोजी ब्राम्हणी :**

'मृत्युंजय' या हिंदू नावाने मराठी साहित्यास परिचित असलेल्या हा मुसलमान संत होय. शहा मुंतोजी, शहा महमद बमणी, शांत ब्राह्मणी बेदरीचा बहमनी पादशा, मृत्युंजय, मूर्तजा कादरी, ज्ञा-नसा□र-नंद, ज्ञा-नसा□र अय्या अशी निरनिराळी नावे निरनिराळ्या कारणाने प्राप्त झालेली आहेत. मुंतोजी ब्राह्मणी यांनी राजवैभवाचा त्याग करुन ते कल्याणीला आले व दिंडी बरोबर ते पंढरपूरला गेले. तीन दिवस पांडूरंगाच्या दारी धरणे धरले. तिसऱ्या दिवशी रात्री विवेकसिंधूची एक प्रत हाती पडली. कल्याणीच्या सहजानंदला गुरु करण्याचा स्वप्नादेश झााला. सहजानंदाची भेट झाली. त्यांनी अनुग्रह करुन उपदेश केले. त्यांचे नांव 'मृत्युजंय' असे ठेवले. मुंतोजी अंगी पूर्ण वैराग्य बनले. तो खऱ्या अर्थाने ब्राह्मण म्हणजे ब्रम्ह जाणणारा झाला. त्याला 'ज्ञा-नसा□रा-नंद' हे सांप्रदायि□ -नाव दिले. येथील ब्राह्मणांनी विरोध केला. ब्राह्मणांनी त्याला एक अट घातली. तीन वेळा याला आगीत घाला, वाचला तर ब्राह्मण समजू, मृत्युंजय या प्रायश्चित विधीतूनही वाचले. मृत्युंजय हे नाव सार्थ □ले. कल्याण हे लिंगायतांचे मुख्य केंद्र होते. गुरुच्या सांगण्यावरुन ते पुढे नारायणपूरला राहू लागले. तेव्हा तेथील लिंगायत लोक मुंतोजीच्या चमत्काराने प्रभावित झाले व त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. सदगुरु भेटल्याशिवाय परमानुभवाची 'वेगळी खूण' कळत नाही असे ते सांगतात.

वेळला सदगुरु भ्रम्ह सुकाळ जाला ।
स्वानंदाचा ठेवा सर्वगत सापडला ।
सदगुरुचे वाक्य म्हणिजे मुसावले ब्रह्म ।
कळालिया हे वर्म कैचे उरले कर्म ।।४।।

मुंतोजी ब्राह्मणी यांचे आठ ग्रंथ, काही पदे व अभंग उपलब्ध आहेत.

**सिध्दसंकेत प्रबंध :** हा त्यांचा सर्वात मोठा ग्रंथ आहे. नऊ प्रकरणे असून दोन हजार ओव्या आहेत. रामाने सीतेला केलेला उपदेश असे या ग्रंथाचे स्वरुप आहे.

**अनुभवसार :** या ग्रंथाचे 'अमृतसार' व 'ज्ञानामृत' अशीही दोन नावे आढळतात. हा ४२ ओव्यांचा ग्रंथ आहे. निखळ आत्म्याचा निर्णय तत्त्वसंवाद असा या ग्रंथाचा स्वरुप आहे.

**अद्वैत प्रकाश :** हा ग्रंथ चार प्रकरणात विभागला असून एकूण ओवी संख्या ५७८ आहे. या ग्रंथात वेदशास्त्र व पुराणाचे सार आहे.

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014

Available online at www.isrj.org

**प्र□ाशदीप :** या ग्रंथात पाच प्रकरणे आहे. एकूण ओवी संख्या ३९९ आहे. या ग्रंथात उपनिषदाचे सार आहे. ज्या व्यक्तीचे परमेश्वरा विषयी भक्ती आहे त्यानेच हा ग्रंथ वाचावे असे सांगितले आहे.

'उपनिषदाचे सार । वेदशास्त्रांचे गव्हर ।
सिध्दान्तांचे बीजाक्षर । असे या ग्रंथाचे स्वरुप आहे.

**स्वरुप समाधा□ :** या ग्रंथात तीन अध्याय आहेत. एकूण ओवी ३९४ आहेत. आत्मतत्त्वातच साक्षात्कार झाल्यानंतर त्रिकुटी कशी लुप्त होते याचे वर्णन आले आहे. थोडक्यात वेदान्तसिध्दान्ताचे रहस्याचे वर्ण-न □ले आहे.

**अमृतानुभव :** या ग्रंथाची ओवी संख्या अंदाजे तीनशे आहेत. हा ग्रंथ 'आत्मानुभव', 'परमामृत' या नावानेही प्रसिध्द आहे. यात ज्ञानेश्वर व मुकुंदराजाशी असलेला ऋणानुबंधाचा वर्णन केला आहे.

**जीवोध्दरण :** हा □ंथ तेरा प्रकरणात विभागला असून १२०० ओवी संख्या आहे. या ग्रंथात जीवाच्या उध्दारासाठी काय केले पाहिजे याचे वर्णन केले आहे.

**पंचीकरण :** हा ग्रंथ 'पंचीकरण परिभाषेचा संस्कृत फारशी कोश' आहे.

शाह मुतबजी ब्रह्मणी
जिनमे नही मनामनी ।
पंचीकरण का खोज किये
हिंदू-मुसलमान येक कर दिये ।।

यात हिंदू व मुसलमानी धर्मग्रंथातील तत्त्वे व विचार एकच आहेत असे सांगितले आहे. हिंदू धर्माशी जुळतील अशी सूफी पंथातील तत्त्वे व साम्यत्वे यात विशद केली आहेत.

**हुसेन अंबरखान :**

भागवदगीतेवर टीका करणारा हा पहिला सूफी/मुसलमान भाष्यकार होय. 'गीतागंगेत पावन झालेला यवन' असे त्यांचे वर्णन रा.चिं. ढेरे यांनी केले आहे. इ.स. १६५३ मध्ये अंबर हुसेनी यांनी गीतेवर ८७१ ओव्यांची टीका लिहिली आहे. अंबरखान हे त्याच्या घराण्याचे नाव असून आपल्या गीताटीकेच्या प्रारंभी त्यांनी आपल्या कुलाची परंपरा सांगितली आहे.

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

आधी अंबर अंबरखान । त्याचा पुत्र अंबरखान ।
त्याचा सुत हुसेनी अंबरखान । असे जगद्वंद्य ।।
वरील ओवीत कुल परंपरेचा वर्णन केला आहे.
अश्विन यु. १० शके १५७५ ला टीकालेखन समाप्त झाल्याचा उल्लेख त्यांने ग्रंथात केला आहे.
भेदा भेदाचा आग्रह उदंड । तोचि विघ्नसमूह प्रचंड ।

तयाते नाशिता जो वक्रतुंड । तया नमस्कारु ।। असे श्रीगणेशवंदन निःसंशय उल्लेखनीय आहे. भेदाभेदाचा नाश करुन अद्वैताचे अधिष्ठान त्यांनी केले. बहुश्रुतता व आत्मविश्वास त्यांच्या लेखनात प्रकट झालेला आहे. प्रभावी व रसाळ भाषाशैली हे त्यांच्या कवित्त्वाची वैशिष्ट्ये असून त्यांची मार्मिक दृष्टांत योजनाही लक्ष वेधून घेते. एक मुसलमान संत भगवदगीतेवर भक्तीभावाने सुंदर भाष्य लिहितो, पण एखादा मराठी संत कवी कुराणावर एखादा भाष्य लिहिताना दिसून येत नाही.

**अलमखान :**

अलमखानाची चरित्रलेखन भानजी त्र्यंबक देशपांडे या नागेश सांप्रदायिकाने इ.स. १८४८ मध्ये लिहिलेल्या 'नागेशलीलामृत' या ग्रंथाच्या ३९ व्या अध्यायात वर्णन केले आहे.

'विंध्याद्री पैल प्रदेशी । अलमखान महापूरवासी ।
चवघे बांधव सुखेसी । माजी गुणरासी धाकटा हा ।।

विंध्य पर्वताच्या पलीकडे महापूर नावाच्या गावचे आलमखान रहिवासी होते. एकूण चार भावंडे होते त्यात हे सर्वात धाकटे भाऊ होते म्हणन सर्वात जास्त लाडके होते. लहाणपणापासूनच संसाराविषयी आस्था नव्हती. पुढे कर्नाटकातल्या कल्याणी जवळचा जंगलात राहू लागले. तेथे एका रामनृपती नावाच्या राजाला परचक्रापासून वाचविले. त्या राजाने आलमखानला सन्मानाने आपल्याजवळ ठेवले. वैभवात रहायची इच्छा नव्हती. त्याची वृत्ती विरक्त होते, कल्याणी तेथे त्यांना वडवाळ सिध्द नागेशाने संन्याशाच्या रुपाने दर्शन दिले. नागेशाचे आदेशाप्रमाणे आलमखान मुगळी येथे राहून ईश्वर साधना केले.

आलमखानची साहित्यनिर्मिती ही पद रचनेच्या स्वरुपात आहे. त्याची फक्त पंधरा पदे उपलब्ध आहेत. गुरुकृपा, संतमहिमा, संकल्प-विकल्प इत्यादीविषयी आलमखान यांनी पदरचना केली आहे.

**शे□ महंमद :**

शेख महमंदास मराठी संतमंडळात 'कबीराचा अवतार' म्हणून ओळखले जाते. इ.स. १५६० ते १६६० हा त्यांचा जीवनकाल आहे. सूफी संथातील कादरी शाखेतील हा एक क्रांतिकारक विचारांचा हा एक महान संत महमंद गौस हा भारतात आलेला पहिला प्रचारक आहे. राजे महमंद हा त्याचा शिष्य होते. राजे महंमदाचा मुलगा शेख महमंद होय. राजे महमदांने आपला शिष्य चाँद बोदलेकडून स्वतःच्या मुलाला म्हणजे शेख महमंदाला दी□

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

देवविली. शेख महमंद यांचा "योगसंग्राम" हा प्रमुख ग्रंथ आहे. 'योगसंग्रामांची रचना शके १९६७ (इ.स.१६४५) मध्ये पू झाली. यात एकूण सतरा प्रसंग आणि २३१९ ओवी आहेत. शेख महमंदमध्ये हिंदू-मुस्लीम सम-वयवाद दिसून येते. ते 'योगसंग्रामा'त म्हणतात.

अविंध यातीस निजलों । कुराण पुराण बोलो लागलो ।
वल्ली साधुसिध्दास मानलो । स्वहित परहिता गुणे ।।

'योगसंग्राम' या ग्रंथात सत्वसार, सदगुरुमहिमा, भक्तिबोध, नाममहिमा, विवेक, द्वैताद्वैत, आत्मज्ञा-न, कूट, ब्रह्मज्ञान, जन्म-मरण इत्यादीवर सविस्तर वर्णन केले आहे.

'पवनविजय' हा शेख महंमदाचा दुसरा ग्रंथ आहे. हा ग्रंथ संस्कृतमधील 'शिवस्वरोदया'चा अनुवाद केला आहे. 'निष्कलंकप्रबोध' हा त्यांचा तिसरा ग्रंथ आहे. या ग्रंथात शेख महमंद बाह्य अवडंबरावर व क्षुद्र देवतांच्या उपासनेवर टीका केली आहे. 'ज्ञानसागर' हा त्यांचा चौथा ग्रंथ आहे. तसेच रुपके, भारुडे, स्फुट अभंग इत्यादी लेखन केले आहे. इ.स.१९६० च्या सुमारास फाल्गुन वद्य नवमीस त्यांनी देह ठेवला.

**शेख सुलतान :**

हा संत छत्रपती शाहू महाराजांच्या काळात होऊन गेले. शाहू महाराजांचा आश्रय लाभलेला होता. कऱ्हाड जवळच्या कार्वे येथील रहिवासी होते. हा मूळचा तुरेवाला शाहीर होते. शृंगारिक लावण्याबरोबर भेदिक लावण्या रचण्यात प्रवीण होते. साताऱ्याच्या गोपाळनाथ नावाचे संताचे सत्संग त्यांना लाभला. त्यांच्या शृंगारसक्तीचा ओध आटून तेथे ईश्वरी प्रेमाचा रमणीय वृक्ष वाढीस लागाला. गुरुची सेवा गुरुने दाखविलेल्या मार्गाने साधना आणि वेदान्ताच्या आधारे कीर्तनरचना अशा त्रिविध प्रवाहांनी शेख सुलतानाचा जीवन ओघ संपन्न झाला. शेख सुलतान यांनी पुढील साहित्याची निर्मिती केली आहे.

**सती अनुसया :** हे प्रकरण २२ कडव्यांचे आहे. त्याचे स्वरुप लावणी ढंगाचे लोककाव्य आहे. यामध्ये अनुसयेच्या सतीत्वाच्या प्रभावाची कथा गायिली आहे.

**गणपति जन्म :** हे २८ ओव्यांचे कथाकाव्य आहे. तपाच्या साहाय्याने शंकराला प्रसन्न करुन घेणारा सिंधुरासूर हा गणेशाकडून मारला जातो. ही कथा स्कंद पुराणाच्या आधारे लिहिले आहे.

**हनुमंत जन्म :** अंजनीपुत्र हनुमानाची जन्मकथा 'हनुमंतजन्म' ही कथा १७ ओव्यात गायिलेली आहे.

**शिवरात्री था :** ही कथा एकूण ४९ ओव्यामध्ये रचली आहे. व्याध आणि मृग आणि मृगकुटुंबातील प्रत्येकाची स्वतः मरुन इतरांना वाचविण्याची त्यागवृत्ती यांचे 'शिवरात्रीकथेत' आहे.

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

**कोल्हाट्याचे चरित्र :** यात एकूण ३३ ओव्यांचे काव्यग्रंथ आहे. स्त्रीविषयक आसक्तीच्या दुष्परिणामाच्या पार्श्वभूमीवर वैराग्याचे वैभव देण्यासाठी 'कोल्ह्याचे चरित्र' रचलेले आहे.

याशिवाय शेख सुलतानाची तीन मराठी पदे व दोन आरत्या उपलब्ध आहेत.

**शहामुनी :** 'शहाममूनी' चे मूळ नाव शहा हुसेन असे होते. नगर जिल्ह्यातील श्रीगोंद्यापासून दक्षिणेस दहा-बारा मैलावर असलेले हे त्यांचे जन्मस्थान आहे. त्यांचा जन्म इ.स. १७४९ मध्ये झाला. यांचे चार पिढ्यांपासून हिंदू देवदेवताच्या भक्ती करीत होते. 'शहा' हे कवीचे 'मूनी' हे त्यांच्या गुरुचे नाव आहे. सूफी मतामध्ये मा-य व प्रचलित गुरुविषयी कृतज्ञताभाव आणि इब्न अरबी प्रणीत 'वहतुल वुजूद (अद्वैतवाद) म्हणजेच अद्वैतबोधाचा बाणा ही दोन ठळक वैशिष्ट्ये त्यांच्या 'सिध्दांतबोध' मध्ये प्रतिबिंबित झालेले आहेत. या ग्रंथाची एकूण ५० अध्याय असून एकूण ९८५८ ओवीसंख्या आहे. हा ग्रंथ सातारा जिल्ह्यातील पठारीमंडळ येथे रचला आहे. आपण मुसलमान कुळात जन्मलो याचे याला होणारे दु:ख त्याने 'सिध्दान्तबोधा'त स्पष्टपणे मांडलेले आहे.

नव्हे यातीचा ब्राह्मण । क्षत्रिय वैश्य नोहे जाण ।
शूद्रापरीस हीन वर्ण । अविंधवंशी जन्मलो ।।
ज्यांचा शास्त्रमार्ग उफराटा । म्हणती महाराष्ट्र धर्म खोटा ।।
शिवालये मुर्ती भंगिती हटा । देवद्रोही हिंसाचारी ।।
जयांच्या सणाच्या दिवशी । वधिता गो उल्हास मानसी ।।
वेदशास्त्र पुराणासी । हेळासिती उध्दट ।।
ऐसे खाणीत जन्मलो । श्रीकृष्णभक्तीसी लागलो ।
तुम्हां संताचे पदरी पडलो । अंगीकारावे उचित ।।

शहामूनी हा पराकोटीचा गुरुभक्त आहे. आपल्या ग्रंथरचनेचे सारे श्रेय त्याने गुरुकृपेला दिलेले आहे. शहामूनीचे विचार उदार व समन्वशील असे आहेत.

महाराष्ट्रातील सूफी संताबाबत डॉ. रा.चिं. ढेरे म्हणतात "द्वैतभावाचा निरास करुन अद्वयानंद वैभवाची लयलूट करणाऱ्या मुसलमान मराठी संतकवींनी हिंदू संतांना उत्कट सहयोग देऊन महाराष्ट्राची उदार आणि समन्वयशील सांस्कृतिक परंपरा समृध्द करण्यात मोठा वाटा उचलला आहे. म्हणूनच समग्र मराठी लोकमानस त्यांच्याशी सदैव कृतज्ञ राहिले आहे."

मुसलमान सूफी संतकवींनी तेराव्या शतकापासून (बहामनी कालापासून ते पेशवेपर्यंत) अठराव्या शतकापर्यंत मराठी वाङ्‍मयात मोलाची भर घातली आहे.

**निष्कर्ष :**

१. सूफी संतांनी उदार व समन्वशील विचार मांडले.
२. मराठी संत व सूफीसंतामध्ये अनुबंध निर्माण झाले होते.

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

३. मराठी संताच्या काव्याचे प्रभाव सूफी संताच्या साहित्यावर दिसून येते.
४. हिंदू व मुस्लिम ऐक्याचे दर्शन सर्वच सूफी संतांच्या साहित्यातून दिसून येते.
५. मध्ययुगीन मराठी साहित्यात मोलाचे भर घातले.
६. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनाच्या अभ्यासासाठी या सूफी संताच्या वाङ्मयाचा उपयोग होतो.

**संदर्भ :**

१. मुसलमान मराठी संतकवी - डॉ. रा. चिं. ढरे पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
२. सूफी तत्त्वाज्ञान : स्वरुप आणि चिंतन - डॉ. मुहम्मद आजम, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
३. मुसलमान (सूफी) संतांचे मराठी साहित्य, डॉ. यू.म. पठाण.
४. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग तिसरा अ.ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन पुणे, प्र.आ. ऑगस्ट १९७३.
५. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती २००६.